
# प्रबोधशिल्पी अण्णा भाऊ साठे



संपादक

डॉ. डी. बी. ताडेराव    डॉ. सतीश कामत

# प्रबोधशिल्पी


# अण्णा भाऊ साठे

**-: संपादक :-**

**डॉ. डी. बी. ताडेराव**
इतिहास विभाग प्रमुख
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग

**डॉ. सतीश कामत**
प्र. प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग

**शिवानी प्रकाशन, पुणे**




**साहित्य सम्राट अण्णा  भाऊ साठे यांच्या**

**जन्मशताब्दी वर्षानिमित्त**

**विनम्र अभिवादन!**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | **दृष्टी व्यापक करणारा लेखक अण्णा भाऊ साठे**<br>डॉ. गिरीश मोरे, कोल्हापूर | १६ |
| २ | **अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी – इतिहासाची मुसाफिरी**<br>डॉ. सोमनाथ डी. कदम | २२ |
| ३ | **अण्णा भाऊ साठे लिखित स्तालिनग्राडचा पोवाडा : ऐतिहासिक मूल्यांकन**<br>डॉ. शितल पंचीकर | २९ |
| ४ | **अण्णाभाऊ साठे यांचे क्रांतिकारक सामाजिक कार्य**<br>डॉ. पठाण झेड. ए. | ३५ |
| ५ | **थोर आंबेडकरवादी साहित्यसम्राट : अण्णा भाऊ साठे**<br>डॉ. सतीश कामत | ४० |
| ६ | **अण्णा भाऊ साठे यांची क्रांतिकारी शाहिरी**<br>डॉ. रघुनाथ केंगार | ४७ |
| ७ | **अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान**<br>डॉ. नितेश सुरवसे | ५३ |
| ८ | **अण्णा भाऊ साठे यांचे कथालेखन**<br>डॉ. भाऊसाहेब मुरलीधर नन्नवरे | ५८ |
| ९ | **साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : अष्टपैलू व्यक्तिमत्व**<br>डॉ. बळीराम गायकवाड | ६३ |
| १० | **लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी, पोवाडे व वगनाट्ये : एक अभ्यास**<br>डॉ. स्वाती रामराव सरोदे | ६७ |
| ११ | **अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान**<br>डॉ. राजेंद्र आत्माराम मुंबरकर | ७१ |
| १२ | **अण्णा भाऊ साठे व कामगार चळवळ**<br>डॉ. उर्मिला क्षीरसागर | ७७ |
| १३ | **अष्टपैलू लोकनेते अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास**<br>डॉ. वंदना राजेश शिंदे | ८२ |

| | | |
|---|---|---|
| २९ | **आण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाज**<br>डॉ. सुनिल सुखदेव लोखंडे | १७९ |
| ३० | **अण्णा भाऊ साठे यांच्या कथांमधील समाजदर्शन**<br>डॉ. वर्षा शिरीष फाटक | १८३ |
| ३१ | **आण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री पात्रांचा विविधांगी अभ्यास**<br>डॉ. लक्ष्मण गीते | १९० |
| ३२ | **अण्णा भाऊ साठे यांचे कथासाहित्य आणि समकालीन वास्तव**<br>डॉ. भूषण ज्ञानदेव काटे-पाटील | १९४ |
| ३३ | **अण्णा भाऊ साठे : एक थोर साहित्यिक**<br>डॉ. विद्या शरद मोदी | १९९ |
| ३४ | **अण्णा भाऊ साठे : आजरामर साहित्याचा निर्माता**<br>डॉ. शेख शहाजहान बशीर | २०५ |
| ३५ | **अण्णा भाऊ साठे : एक प्रभावी व्यक्तिमत्व**<br>डॉ. अर्चना टाक | २०८ |
| ३६ | **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री चित्रण**<br>शेख समरिनबेगम इब्राहिम | २११ |
| ३७ | **अण्णा भाऊ साठे : एक बहुआयामी व्यक्तीमत्व**<br>डॉ. राजेंद्र यादवराव बारसागड | २१६ |
| ३८ | **अण्णाभाऊंच्या साहित्यातील स्त्री जीवन**<br>डॉ. महादेव सदाशिव डीसले | २२१ |
| ३९ | **अण्णाभाऊ यांची लोकनाट्ये : समाज जागृतीचे ऐतिहासिक कार्य**<br>अजयकुमार प्रल्हाद लोखंडे | २२७ |
| ४० | **अण्णा भाऊ साठे यांचा  सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोन**<br>प्रा. सुर्यकांत प्रभाकर माने, सौ. ईशा जगदीश गोताड | २३२ |
| ४१ | **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचारांची प्रासंगिकता**<br>डॉ. कहाळेकर सी. एम. | २४० |
| ४२ | **अण्णा भाऊ साठे यांचे समाज कार्य**<br>डॉ. अतुल पद्माकर खोसे | २४८ |
| ४३ | **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री चित्रण**<br>श्री. रमेश विठ्ठलराव शेळके | २५१ |

35

# अण्णा भाऊ साठे : एक प्रभावी व्यक्तिमत्व


## डॉ. अर्चना टाक

*राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर*


आजपर्यंत आपण अनेक साहित्यिकांच्या नावांचा मोठ्या अभिमानाने उल्लेख करत आलेलो आहोत. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, कविता, लेख, वाङ्.मय याची गौरवगाथा वाचनरुपी उपभोगली आहे. पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, सानेगुरुजी, द. मा. मिराजदार, आनंद यादव, उत्तम कांबळे, विश्वास पाटील, बाबा कदम, बहिणाबाई चौधरी या व अशा अनेक प्रतिभावंतांनी साकारलेल्या साहित्य वलयातून आपले डोळे तृप्त झालेले आहेत. साहित्याशी माणसाची जोडलेली नाळ कायमच साहित्याचा शोध घेत असते. यासाठी अनेक साहित्यिकांचा पाठपुरावा करते. मात्र या साहित्याच्या गर्भात नकळत एक साहित्यसूर्य जन्माला आला आणि याची चाहूल कोणालाही लागली नाही.

१ ऑगस्ट १९२० साली म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळी वारणेच्या खो-यात सह्याद्रीच्या कड्याकपारीत असलेल्या सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात वाटेगाव नावाच्या खेडेगावात गावकुसाबाहेर असलेल्या मांग जातीत एका साहित्यसूर्याचा, प्रबोधनकाराचा उदय झाला. हा साहित्यसूर्य म्हणजे अण्णा भाऊ साठे उर्फ तुकाराम. अण्णा भाऊ बालपणी डोंगर, दऱ्या, राने, वने, गुहा, नदीकाठ याठिकाणी त्यांच्या सवंगड्यासमवेत भटकंती करत असत. तसेच त्यांना आसपासच्या खेड्यात जत्रा पाहणे आवडत असे. या जत्रांमधील दुकाने, माणसे, तंबू, राहुट्या, कुस्त्या, कोल्हाट्यांच्या कसरती, तमाशे, पूजा, दैवतांच्या पालख्या, त्यांच्या मिरवणुकी, मुरळ्यांची नृत्ये व गाणी यांचे अण्णा भाऊ बारकाईने निरीक्षण करत. तसेच अण्णा भाऊंची अजून एक आवड होती. ती आवड म्हणजे लोकगीते, स्तवने, पोवाडे पाठ करणे, ते पोवाडे आवाजाच्या वरच्या पट्टीत गाणे, साहसकथा, शिकारकथा, लोककथा, दंतकथा व भूतकथा ऐकणे आणि त्या इतरांना सांगणे. याचबरोबर अण्णा भाऊ तमाशा पार्टी बरोबर फिरत असत. त्या काळी महाराष्ट्रात अनेक तमासगीर होते. अण्णा भाऊंच्या काही नातेवाईकांच्या मालकीच्या तमाशा पार्ट्या होत्या. आणि या तमाशा पार्ट्या ग्रामीण भागात खेळ करत असत.

अण्णा भाऊंमध्ये तमाशासाठी आवश्यक असणारे गुण होते. या गुणांच्या आधारावर अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या नात्यातल्या एका व्यक्तीच्या तमाशा पार्टीत काम करायला सुरुवात केली. महाराष्ट्रात मांग समाजाने तमाशा कलेला मोठे योगदान दिले. अण्णा भाऊ

हे त्याच परंपरेचे प्रतिनिधी व पाईक होते. अण्णा भाऊंच्या अंगी काही गुण जन्मजात होते. त्यांना एखाद्या भूमिकेचे अचूक व सखोल आकलन होत असे. तसेच त्यांना तर्कसंगतपणे व ओघावतेपणे बोलण्याची सवय होती. त्यांचे पाठांतर उत्कृष्ठ होते. तसेच त्यांचा आवाज सुद्धा सुस्पष्ट व परखड होता. अण्णा भाऊ तमाशात विविध भूमिका वठवत व गाणे म्हणत असत. त्याचबरोबर हार्मोनियम, तबला, सारंगी, ढोलकी, बुलबुलतरंग व इतर वाद्ये वाजविण्यात अण्णा भाऊ तरबेज होते. त्यामुळे त्यांनी तमाशात वेगवेगळे पात्र साकारून अंगभूत गुण वाढीस लावले. तसेच अण्णा भाऊंनी तमाशाला नवसंजीवनी देऊन तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर केले. अण्णा भाऊंनी तमाशाचे केवळ नावच बदलले नाही तर त्याचे अंतरंगही पालटले. पारंपारिक तमाशात 'गणा'मध्ये गणेश वंदना व गणेश स्तवन असते. अण्णा भाऊंनी ही परंपरा मोडून पहिल्या नमनात मातृभूमी, हुतात्मे, राष्ट्रपुरुष यांना मान देण्याचे महत्त्वाचे कार्य करून राष्ट्रप्रेमाला साद घातली व तमाशाला एक नवी दृष्टी मिळवून दिली.

अण्णा भाऊंनी फक्त लोकसाहित्याच्या क्षेत्रातच स्वतःचा ठसा उमटवला नाही तर शेतकरी, कामगारांच्या समस्या व अडचणी, दलित, पीडीत शोषितांच्या व्यथा-वेदना त्यांनी त्यांच्या संवादातून श्रोतावर्गापुढे मांडल्या आणि श्रमिकांच्या एकजुटीचे सामर्थ्य, अन्यायाचा प्रतिकार करू शकणारी संघटित शक्ती आणि विषमतेच्या पलीकडे नेऊ पाहणारा साम्यवादी विचार त्यांनी जनतेपुढे ठेवला. अण्णाभाऊंनी लोककलेचा उपयोग करून ऐतिहासिक मोलाचे कार्य केले. त्यामुळेच अण्णाभाऊ लोकनाट्याचे जनक ठरले. तसेच त्या काळात ज्यावेळी संपूर्ण देश स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झटत होता त्यावेळी अण्णा भाऊंनी सातारा जिल्ह्यातून हिरीरीने अनेक घडामोडींमध्ये भाग घेतला होता. यासाठी त्यांनी स्वतःचे घर सोडले होते व दऱ्याखोऱ्यांत, डोंगरदऱ्यांत ते लपून राहिले होते. त्यांना आकर्षित करणाऱ्या राजकीय विचारसरणीचा एक धागा मिळाला होता, त्यामुळे ते कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ प्रचारक बनले. त्यांनी १९४४ मध्ये अमर शेख व द. ना. गव्हाणकर यांच्याबरोबर मिळून 'लाल बावटा' कलापथक स्थापन केला होता. म्हणजेच अण्णा भाऊ साठे एक स्वातंत्र्यवीर, लेखक व कवी होते. त्यांनी स्वतः पोवाडे आणि प्रशस्तीपर गीते लिहून ती गाण्यास सुरुवात केली. तसेच अण्णा भाऊंनी अनेक लोकनाट्ये लिहिली. त्यामुळे ते शाहीर अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाऊ लागले. तसेच अण्णा भाऊंनी अनेक कथा, कादंबऱ्या, विनोदी कथा, कविता, आत्मचरित्रात्मक कथा, गुन्हेगारी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा, अंधश्रद्धाविरुद्धच्या कथा, दुःखान्त कथा, कलात्मक कथा, लघुकथा, प्रेमाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, महिलांच्या समस्यांवरील कथा, साहसाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, कौटुंबिक जीवनावरील कथा, लोकनाट्य, नाटके, नाटिका, पोवाडे, निसर्ग वर्णनपर कविता, कल्पनारम्य कविता, राष्ट्रीय कविता, प्रवासवर्णने, वृत्तांत लेखन असे

विविध प्रकारचे लेखन केले. म्हणजेच अण्णा भाऊ हे अष्टपैलू व प्रभावी व्यक्तिमत्व होते. अशा ह्या साहित्यसूर्याचा अस्त १८ जुलै १९६९ ला झाला. मात्र आजही अण्णाभाऊंच्या कार्यकर्तृत्वातून, साहित्यातून ते आपल्या मनात निरंतर प्रज्वलित आहेत.

**संदर्भग्रंथ :**


१) साहित्यसूर्य - प्रा. रमेश करडे

२) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाड्.मय - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

३) भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे - बजरंग कोरडे

४) माझा रशियाचा प्रवास - अण्णा भाऊ साठे